तणावमुक्त जीवनासाठी विश्वशांती आवश्यक : राज्यपाल रमेश बैस

राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते दादा जे. पी. वासवानी यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीटाचे प्रकाशन

पुणे / प्रतिनिधी

आज जगात युद्ध, विविध समूहातील तणावाची स्थिती आढळत असून अशा परिस्थितीत माणसाला तणावमुक्त आणि आनंदी जीवन जगता यावे यासाठी जागतिक शांतता गरजेची आहे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

साधु वासवानी मिशन पुणे द्वारा दादा जे. पी. वासवानी यांच्या स्मरणार्थ काढण्यात आलेल्या टपाल तिकीटाचे प्रकाशन राज्यपाल श्री. बैस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला केंद्रीय दळणवळण राज्य मंत्री देवुसिंह चौहान, आमदार सुनील कांबळे, इंदोरचे आमदार शंकर लालवाणी, महाराष्ट्र आणि गोवा क्षेत्राचे मुख्य पोस्ट मास्टर जनरल किसन कुमार शर्मा, साधु वासवानी मिशनच्या अध्यक्षा श्रीमती आर. ए. वासवानी, कार्यकारी प्रमुख कृष्णा कुमारी, डॉ. वसंत आहुजा, पुणे क्षेत्राचे पोस्ट मास्टर जनरल रामचंद्र जायभाय, डाक सेवा संचालक सिमरन कौर आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. बैस म्हणाले, व्यक्तीची आंतरिक शांती, राष्ट्रांमधील शांततापूर्ण संबंध आणि निसर्गासोबत शांततापूर्ण सहअस्तित्व या तीन पैलूंवर जागतिक शांतता आधारित आहे. आज वैयक्तिक, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तणावाची स्थिती असताना आपल्याला अंतर्गत, बाह्य तसेच निसर्गासोबत शांतता गरजेची आहे. गौरवशाली इतिहास असणारा आपला भारत देश शांततापूर्ण सहअस्तित्वाचे मार्गदर्शन करू शकतो.

महाराष्ट्र ही संत आणि महापुरुषांची भूमि आहे. दादा जशन वासवानी यांच्यातही संत आणि समाज सुधारकांचा समन्वय पहायला मिळतो. ते विचारवंत, लेखक आणि तत्वचिंतक होते. त्यांचे जीवन बंधुभाव, शांती, सद्भावना, करुणा आणि शांतीपूर्ण सहअस्तित्व या मूल्यांवर आधारित होते. नैतिक मूल्य निकोप समाजासाठी आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात या पैलूवर भर देण्यात आला आहे, असे राज्यपाल म्हणाले.

साधु वासवानी यांच्या प्रमाणेच त्यांचे सर्वात विद्वान शिष्य आणि उत्कृष्ट वक्ता असलेल्या दादा वासवानी यांनी आपल्या प्रवचन आणि लेखाद्वारे देश विदेशातील लाखो लोकांना आदर्श जीवन जगण्यासाठी प्रेरित केले. ते महाराष्ट्रातील शांती आणि सद्भावनेचे दूत होते. साधु वासवानी मिशनच्या माध्यमातून दादा जे. पी. वासवानी यांनी शैक्षणिक संस्था, रुग्णालय आणि अन्य सेवाकार्य उभे केले. जात, धर्म, पंथाचा विचार न करता समाजातील सर्व घटकांची सेवा मिशनच्या माध्यमातून होत आहे, अशा शब्दात त्यांनी मिशन आणि दादा वासवानी यांच्या कार्याचा गौरव केला.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. चौहान म्हणाले, भारताला संताची परंपरा असल्याचा आपल्याला अभिमान आहे. संत दादा वासवानी सहज आणि सरळ व्यक्तीमत्व होते. त्यांचे कार्य नेहमीच समाजाला प्रेरणादायी ठरेल असे होते. ते आध्यात्मिक गुरू होते. आज सर्वांना आध्यात्मिक ज्ञानाची गरज आहे. दादा वासवानी यांच्या आध्यात्मिक ज्ञानाचे पालन करणे आणि ते आचरणात आणणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी श्रीमती वासवानी यांनी साधू वासवाणी मिशनच्या कार्याची माहिती दिली. दादा वासवानी यांचा एकात्मता, बंधुभाव, शांतता आणि अध्यात्माचा संदेश आचरणात आणणे हेच त्यांचे खऱ्या अर्थाने स्मरण आहे,असे त्या म्हणाल्या. यावेळी 'नर्क से स्वर्ग तक' या हिंदी आणि 'स्वतः सक्षम बना' या मराठीतील पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल श्री. बैस यांच्या हस्ते करण्यात आले.

थोडक्यात

आरोग्य मंत्री यांच्या हस्ते ४६ वाहनांचे हस्तांतरण

पुणे : जनतेला आरोग्य सुविधा तातडीने पुरविता याव्यात यासाठी खरेदी करण्यात आलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी ४६ वाहनांचे हस्तांतरण विधानभवन येथे सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विभागीय उपायुक्त वर्षा ऊंटवाल-लड्डा, रामचंद्र शिंदे, उपसंचालक कैलास कराळे, आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त, आरोग्य सेवा अंतर्गत राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षकीय कामकाज सुरळीत पार पाडता यावे यासाठी वाहन खरेदीकरिता ३ कोटी ६८ लाख रुपये इतक्या खर्चास शासनाने मंजुरी दिली होती. राज्यातील ५ उपसंचालक, ११ सहायक संचालक, १४ जिल्हा आरोग्य अधिकारी व १६ जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या कार्यालयाला ही वाहने हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना शासनाकडून पुरस्कार

१५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करत स्पर्धेत सहभागी होण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

पुणे : उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना राज्य शासनाच्यावतीने पुरस्कार देण्यात येणार असून स्पर्धेत भाग घेण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.

राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्याचा निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने घेतला आहे. पुणे जिल्ह्यातून ३ गणेश मंडळांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे. जिल्ह्यात एकूण ८ हजार ७३६ सार्वजनिक गणेश मंडळे व ग्रामीण हद्दीत ३९६ एक गाव एक गणपती मंडळे आहेत. धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केलेल्या, स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना स्पर्धेत सहभाग घेता येईल. शासन निर्णयातील अर्जाच्या नमुन्यात पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या ारहेीरीं. श्रिवरसारळश्र.लो या ईमेलवर १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज ऑनलाईन सादर करणे अपेक्षित आहे. राज्यस्तरीय पहिल्या क्रमांकास ५ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास २ लाख ५० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झालेल्या तीन मंडळांशिवाय अन्य गणेशोत्सव मंडळांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल.

शिरूरच्या विद्याधाम प्रशालेचे मैदानी स्पर्धेत यश

शिरूर / प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा परिषद पुणे आयोजित तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा नुकत्याच पार पडल्या असून या स्पर्धेतील विविध खेळांमध्ये विद्याधाम प्रशाला शिरुरच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादित केले असल्याची माहिती प्रशालेचे प्राचार्य प्रकाश कल्याणकर यांनी दिली आहे.

शिरुर येथील सिटी बोरा कॉलेज शिरूर च्या मैदानावर नुकत्याच शालेय क्रीडा स्पर्धा पार पडल्या, या स्पर्धेत विद्याधाम प्रशाला शिरूरच्या खेळाडूंनी अठरा पदके मिळवले तर बारा खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रशालेतील विद्यार्थ्यांपैकी लांब उडी स्पर्धेत वेदिका धावडे, निकीता कोकरे यांनी तर गोळाफेक स्पर्धेत सायली सातव, सक्षम गवारे, संतोष वाळके, थाळीफेक स्पर्धेत रुद्र वाळके, आदित्य व्यवहारे, ओम ढोबळे, शंभर मीटर धावणेत ऋतुजा बढे, साहिल सरोदे, तिहेरी उडी स्पर्धेत वेदिका धावडे, भालाफेक स्पर्धेत ऋतुजा बढे, दोनशे मीटर धावणे स्पर्धेत रेहान शेख, चारशे मीटर धावणे स्पर्धेत ओंकार सकट, हर्षद ढवळे या विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा विभाग प्रमुख सचिन रासकर, क्रीडा स्पर्धा प्रमुख बारकू येवले, क्रीडा शिक्षक भास्कर करंजुले, मच्छिंद्र बनकर, संदीप तानवडे, साजिद तांबोळी, कल्पना भोगावडे, वैशाली वाघमारे यांनी मार्गदर्शन केले तर सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे प्रशालेचे प्राचार्य प्रकाश कल्याणकर, पर्यवेक्षक बाबुराव कोकाटे, गुरुदत्त पाचर्णे, देवीविजयालक्ष्मी लकडे, शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल बोरा व संस्थेचे सचिव नंदकुमार निकम यांनी अभिनंदन केले आहे.

'वृद्ध मित्र' राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मार्गदर्शक उपक्रम व्हावा : राज्यपाल रमेश बैस

पुणे : वृद्ध नागरिकांचे जीवन अधिक सुखद व्हावे आणि सामाजिक व आर्थिक आव्हानांना सहजपणे तोंड देता यावे यासाठी 'वृद्ध मित्र' सारख्या दूरदृष्टीने राबविलेल्या अभिनव उपक्रमांची आवश्यकता आहे. सर्वांनी मिळून या उपक्रमाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मार्गदर्शक उपक्रम करण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

सोसाइटी ऑफ कम्युनिटी हेल्थ ओरिएंटेड ऑपरेशनल लिंक्स (स्कूल) द्वारा आयोजित 'वृद्ध मित्र' कार्यक्रमाच्या शहरस्तरावरील विस्तार कार्यक्रमाच्या उद्घाघटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, 'स्कूल'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बेनझीर पाटील आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री.बैस म्हणाले, ज्येष्ठ नागरिक हे वयासोबत येणारे अनुभव आणि ज्ञानाचे भांडार आहेत. समाजावर त्यांचे असलेले ऋण लक्षात घेता ते आदर आणि सन्मानास पात्र आहेत. देशात २०५० पर्यंत वृद्धांची संख्या ३१ कोटीपेक्षा अधिक होण्याचा अंदाज आहे. वृद्ध साधारणत: अर्थार्जनाचे काम करत नसल्याने त्यांना गंभीर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्याकडे ओझे म्हणून पाहणे किंवा त्यांची कुटुंबात होणारी उपेक्षा ही वेदनादायी असते.

पारंपरिक कुटुंब पद्धतीतील बदलामुळे येणारी सामाजिक सुरक्षेची कमतरता आणि एकटेपणाच्या भावनेने ही समस्या अधिक वाढते. पेन्शन घेणाऱ्यांची संख्या कमी असल्याने पौष्टिक आहार, आरोग्यसेवा, औषधे घेण्याची समस्या त्यांच्यासमोर असते. अशावेळी त्यांना समाजाकडून प्रेमाची आणि सहकार्याची आवश्यकता असते. हे कार्य 'वृद्ध मित्र' सारख्या संस्था करीत आहेत. अशा प्रकारच्या प्रयत्नांची गरज प्रत्येक स्तरावर आहे, असे राज्यपाल म्हणाले. समाजातील वृद्ध व्यक्तींना जीवनाच्या या टप्प्यावर भावनात्मक, सामाजिक आणि मानसिक आधाराची आवश्यकता असते. त्यादृष्टीने 'वृद्ध मित्र' हा 'स्कूल' संस्थेचा अभिनव उपक्रम आहे. वृद्धांच्या घरी जावून आवश्यक सेवा देणे ही सर्वोच्च सेवा आहे. प्रत्येक रुग्णालयात वृद्धांसाठी स्वतंत्र युनिट असणे, त्यांच्यासाठी स्वतंत्र रुग्णवाहिका ही आजची गरज आहे. यासोबतच घरातील वृद्ध हे ओझे नाही तर आशीर्वाद आहे हे तरुणांनी समजून घेण्याचीही गरज आहे.

गृहनिर्माण संस्थांमध्ये वृद्ध व्यक्तींची देखभाल करण्यासाठी सदस्यांनी पुढाकार घ्यायला हवा. स्कूलसारख्या संस्थांनी शासनाकडे वृद्ध व्यक्तींसाठी धोरण जाहीर करण्यासाठी आग्रह धरावा. पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने सुरू करण्यात येत असलेला 'वृद्ध मित्र' हा अभिनव उपक्रम सर्व ठिकाणी राबविला जावा, अशी अपेक्षा राज्यपाल श्री.बैस यांनी व्यक्त केली.

मनपा आयुक्त विक्रम कुमार म्हणाले, शहरातील झोपडपट्टी भागात राहणाऱ्या वृद्ध व्यक्तींना मदत करण्यासाठी आणि पुणे शहराला वृद्ध व्यक्तींसाठी अनुकूल शहर बनविण्याचा 'स्कूल' संस्थेचा प्रयत्न आहे. महानगरपालिकेच्या दोन रुग्णालयात वृद्धांसाठी स्वतंत्र कक्ष करण्यात आला असून इतरही रुग्णालयात 'स्कूल'च्या सहकार्याने असा कक्ष सुरू करण्याचा प्रयत्न आहे, असे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या अध्यक्षा डॉ. बेनजीर पाटील म्हणाल्या, वृद्धांना सन्मानजनक, अनुकूल जीवन जगता यावे यासाठी संस्था काम करीत आहे. २८ हजार वृद्धांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचला आहे. यातील ८ टक्के वृद्ध एकटे रहात आहेत. उपक्रमांतर्गत वृद्धांना विविध सुविधा दिल्या जातात. विविध सेवाभावी संस्था आणि स्वयंसेवकांचे यासाठी सहकार्य मिळत आहे, अशी माहिती त्यांनी दिली. राज्यपाल महोदयांच्या हस्ते 'वृद्ध मित्र' उपक्रमाशी जोडल्या गेलेल्या संस्थांचा आणि व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.

बिरोबा मंदिर प्रांण प्रतिष्ठापना व कलशारोहण उत्साहात

सासवड / प्रतिनिधी

पिसे ठोंबरे वस्ती (ता. पुरंदर) येथील बिरोबा मंदिर प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण उत्सवात सकाळी मिरवणुकीला प्रथम गावातून सुरुवात झाली. नंतर मूर्ती प्राणप्रतिष्ठापना पूजेसाठी बायडाबाई मातार बाबा ठोंबरे,रेखाबाई रामचंद्र ठोंबरे, मनीषा संतोष ठोंबरे, मंदाबाई शिवाजी ठोंबरे , हौसाबाई बबन ठोंबरे या पाच जोड्या पूजेसाठी बसून, त्यासाठी राजेंद्र अत्रे, मयूर अत्रे, ऋषिकेश जहागीरदार, शामकांत जहागीरदार यांच्या सहकाऱ्यांनी स्थापना करण्यात आली .कलशारोहण कुंडलगिरी गोसावी महाराज(सोनजाई देवीचे मठाधिपती बावधन वाई) व बाबुराव गिरी गोसावी महाराज (बावधन वाई) यांच्या हस्ते बिरोबा मंदिराचे कलशारोहण करण्यात आले.आरती व महाप्रसादाचा लाभ आलेल्या भक्तासाठी ठोंबरे कुटुंबाकडून चांगल्या उत्साहात प्रसाद वाटप करण्यात आले.

मेंढा' भावड्या 'नावाने सोमनाथ ठोंबरे यांच्या मेंढ्यांनी गोल रिगण बिरोबा देवाच्या पटांगणात चांगले उत्साहात पार पडले. बिरोबा मंदिराचे ठोंबरे वस्ती येथील कामकाज पिसे येथील लोक वर्गणीतून व ठोंबरे यांच्याकडून जास्त प्रमाणात निधी उपलब्ध करून या मंदिराचे काम पूर्ण झाले .राहिलेल्या सभामंडपाचे कामकाज करण्यासाठी दहा लाख रुपयांचा निधीची गरज असून त्यासाठी खासदार फंड व आमदार फंडातून मंजुरी मिळाली त्यासाठी ठोंबरे वस्तीतील सभासदाकडून पत्रकार यांच्याकडे सर्वांच्या सहकार्याने मागणी करण्यात आली. यासाठी प्रामुख्याने ठोंबरे कुटुंबाच्या सहकारातून मागणी आहे.

चुकीची दुरुस्ती

दिनांक १२/०९/२०२३ प्रसिध्द झालेल्या नोटीसमध्ये नजर चुकीने प्रसिध्दी दिनांक १९/०९/२०३ झाली आहे तरी, ता. ११/०९/२०२३ आसे वाचावे.

जाहीर नोटीस

सर्वसाधारणपणे जनतेला जाहीर नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, कोटक महिंद्रा बँक लिमिटेडने खाली दिलेल्या वाहनांचा लिलाव आयोजित केला आहे.
१. सीबी टाटा एसी गोल्ड **MH45AF8165** वायओएम- २०२२ किमान राखीव किंमत : १६२०००/-
मेसर्स कोटक सह महिंद्रा बँक त्याच्या हायपोथकेशन अंतर्गत विक्री करत आहे. गाडी ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीत विक्री करण्यात येईल.
इच्छुक खरेदीदारांनी खालील पत्त्यावर ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने शाखेच्या पत्त्यावर ०७ दिवसांच्या आत किंवा १९.०९.२०२३ पूर्वी त्यांचे कोटेशन देऊ शकतात.
शाखेचा पत्ता : कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड, न्याती युनिट्री, चौथा मजला, झोन पश्चिम-३, सम्राट अशोक रोड, नगर रोड, गुंजन कार्नर, येरवडा पुणे-४११००६ किंवा
संपर्क : योगेश नितुरे
कोटक महिंद्रा बँक लि.
संपर्क/९७६४४४४५७६ ईमेल : yogesh.niture@kotak.com

पंचायत समिती वडगाव, ता.मावळ, जि.पुणे

बी.-१ खुली निविदा सुचना क्र.०३ सन २०२३-२४.

पंचायत समिती वडगाव, ता.मावळ, जि.पुणे येथील खालील कामाची मोहोरबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, म.जी.प्रा. व जि.प.पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांची मोहोरबंद निविदा ठेकेदार यांचेकडून २ पाकिटे पद्धतीनें मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना पंचायत समिती वडगाव.कार्यालय ता.मावळ,जि.पुणे यांच्याकडुन दि.१३/०९/२०२३ ते दि.२०/०९/२०२३ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी १०:०० ते सायं ०४:३० वाजेपर्यंत) देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि.१३/०९/२०२३ ते दि.२०/०९/२०२३ पर्यंत सायं ०४:३० वाजेपर्यंत पंचायत समिती वडगाव. कार्यालय येथे स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी संध्याकाळी ०५:०० वाजता उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजपत्रकीय र.रू.	कोऱ्या निविदेची किंमत र.रू	इसारा र.रू.	काम पुर्ण करावयाचा कालावधी
१.	मौजे धामणे येथे गावांतर्गत बंदिस्त गटर करणे. (१५ वा वित्त आयोग पं.स. बंधित निधी)	५,००,०००/-	५९०/-	१%	३ महिने
२.	मौजे पुसाने येथे भूमिगत गटर लाईन करणे. (एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम २०२१-२२)	३,००,०००/-	३५४/-	१%	३ महिने

टिप:- १.कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पं.स. ने राखुन ठेवला आहे.२.कोणतीही निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार पं.स.ने राखुन ठेवला आहे.३.सदर निविदा मोहोरबंद लिफाफ्यामध्ये स्विकारल्या जातील. सुट्टीच्या दिवशी निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.४.सोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:-१.नोंदणी प्रमाणपत्र २.GST रजिस्ट्रेशन ३.आयकर प्रत ४.पॅनकार्ड ५.PTRE/PTRCE. ५.सोबत योग्य रकमेचा डी.डी.किंवा चेक सादर करणे आवश्यक.

सही/-
उप अभियंता ,
पंचायत समिती वडगाव, ता.मावळ,जि.पुणे

सही/-
गटविकास अधिकारी
पंचायत समिती वडगाव, ता.मावळ,जि.पुणे

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: पुणे

L&T Finance

गहाण मालमत्तेच्या विक्रीचा जाहीर लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचा अधिकृत अधिकारी प्रतिभूतीकरण आणि वित्तीय मत्तांची पुनर्बांधणी आणि प्रतिभूती स्वारस्याची अंमलबजावणी कायदा, 2002 (54 वर्ष 2002) अन्वये आणि सदर कायद्यान्वये प्राप्त शक्तींचा वापर करत पुढील मालमत्तेचा **'जिथे आहे तिथे तत्त्वावर'** आणि **'जे आहे ते'** परिस्थितीत **'जाहीर ई-लिलावाच्या'** माध्यमातून देय रकमा आणि त्यांवरील व्याज, शुल्के आणि खर्च इ. वसुल करण्यासाठी ई-लिलाव करत आहे.

कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 08.09.2023 नुसार (रुपयांमध्ये)	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
१. दिनेश रमणिकलाल पटेल भूत २. जलपा दिनेश पटेल भूत	मालमत्तेचा पत्ता : रो हाऊस / बंगला क्र. आर1/15ए, अधिमापन 232 चौ.मी. सुमारे 2500 चौ.फूट, ''श्री स्वामी समर्थ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड'', अशा जमिनीवर बांधली आहे जिचा सर्व्हे क्र. 148, हिस्सा क्र. 1ए/1/2 सुस रोड पाषाण, पाषाण येथे स्थित, तालुका हवेली, जि. पुणे महाराष्ट्र 411045	H00984012105313 0/H00984012105313 0L/H00984012105313 0G	11 ऑगस्ट 2023	रु. 17,50,000/-	रु. 2,65,63,398.56/-	रु. 1,75,00,000/-	10/10/2023	19/10/2023 सकाळी 11 वाजता

सीमारेषा		
	पूर्व	आर1/14बी
	पश्चिम	आर1/15बी
	उत्तर	सोसायटीचा आतील रस्ता
	दक्षिण	आर1/16ए

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. जाहीर ई-लिलाव उपरोक्त दिनांक व वेळेरोजी पार पाडण्यात येईल, व सदर वेळी उपरोक्त प्रतिभूत मत्तांची **'जिथे आहे तिथे'** तत्त्वावर आणि **'जे आहे ते'** तत्त्वावर विक्री केली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **17/10/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **19/10/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **20/10/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात **ज्याचे नाव : शेखर काळे, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005 आणि संतोष तिवारी, संपर्क क्र. 9920490126 एल अँड टी फायनान्स लि, - कार्यालय : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 13.09.2023
ठिकाण: पुणे

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. * व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com